# MODEL QUESTION PAPER SET-1: 2021 - 22

**MM : 80** | **Std. 10th – MARATHI (THEORY)** | **Time : 3 Hrs**

**Entire Syllabus** | **SOLUTIONS**

## विभाग १- गद्य

### पठित गद्य

**प्र.१.(अ)**

**१.** १) पुल व सुनिताबाई यांनी दिलेल्या शालीचा लेखकाने पाठात केलेला उल्लेख **पुलकित शाल**

२) पाठात उल्लेख असणारी नदी **कृष्णा नदी**

३) सभासंमेलने गाजवणारे कवी **नारायण सुर्वे**

४) लेखक विश्वकोशाचे अध्यक्ष म्हणून गेलेले ठिकाण **वाई**

२. **१)** 'पुलकित' शाल, पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला दिल्या.

३. माझ्या आवडीची वस्तू आहे माझ्या आजीने दिलेली 'शाल' . हा शब्द उच्चरताच मनाला उबदार, स्पर्श जाणवतो . हुडहुडणाऱ्या थंडीची चाहूल लागते . आमच्याकडे पुष्कळ शाली आहेत पण आजीने स्वतः माझ्यासाठी विणलेली शाल तिच्या प्रेमाचे, मायेचे प्रतीक असल्यामुळे ती जपून ठेवली आहे. तिच्या स्पर्शाने आजीची माया जाणवते आणि डोळ्यात अश्रू येतात. या शालीत आजीच्या अनेक आठवणी सामावलेल्या आहेत . हि शाल माझ्यासाठी मौल्यवान ठेवा आहे .

**प्र.१. (आ)**

**१. १)** माशेलकरांना माशेल सोडावे लागले. कारण - ..........
**त्यांच्या वयाच्या सहाव्या वर्षी त्यांचे वडील वारले त्यामुळे उदरनिर्वाहासाठी त्यांना गाव सोडावे लागले.**

**२)** वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत माशेलकरांना अनवाणी राहावं लागलं, कारण ......................
**खालावलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे**

**२.**

डॉ माशेलकर यांच्या आईचे व्यक्तिमत्वाचे विशेष

- दारिद्र्याशी संघर्ष करणारी
- अल्पशिक्षित
- धीर न सोडणारी
- कष्टाळू

**३. स्वमत**

'शिक्षण' घेण्यासाठी गरिबी अडसर ठरत नाही.

'ईच्छा तेथे मार्ग' अशी मराठीमध्ये म्हण आहे . ती शिक्षणाच्या बाबतीतही अगदी खरी आहे असेच म्हणावे लागेल. अत्यंत प्रतिकूल परिस्थीतीतही काही मुलांमध्ये शिकण्याची जिद्द असते, प्रचंड मेहनती वृत्ती असते अशा मुलांना देवही कोणत्या ना कोणत्या रुपात मदत करत असतो. उदाहरणार्थ एखादी श्रीमंत व्यक्ती गरिब विद्यार्थ्याच्या शाळेची फी भरतो, पुस्तकांची गणवेषाची सोयही कुणीतरी करून देतो. एखादया हुशार पण गरीब विद्यार्थ्याला त्याच्या गुणांच्या जोरावर शिष्यवृत्ती मिळते व त्यांचे पुढील शिक्षण होते.

म्हणूनच ज्याला शिक्षण घेण्याची ओढ आहे त्यांच्या प्रगतीत गरिबी अडसर ठरत नाही असे म्हणावे लागेल.

## अपठित गद्य

**प्र.१.(इ)**

**१. १)** महान कार्य करणाऱ्या व्यक्तींना सहन कराव्या लागणाऱ्या गोष्टी
- अनंत अडचणी सहन कराव्या लागतात
- अनंत यातना सहन कराव्या लागतात

**२)** संत ज्ञानेश्वरांना समाजाकडून सहन कराव्या लागलेल्या गोष्टी
- समाजाकडून प्रचंड तिरस्कार सहन करावा लागला
- अपमान सहन करावे लागले

**२. १)** समाजाचे बोल, प्रसंगी शेणाचा माराही सहन करावा लागला.

**२)** कितीही संकटे आली तरी प्रयत्न करत राहिल्यास या प्रयत्नाने जे फळ मिळते त्यातून मिळणार आनंद व समाधान यांचे मोल करता येणे अशक्य आहे.

## विभाग २- पदय

**प्र. २. (अ)**

**१. १)** काळी आई जगवण्यासाठी अपेक्षित कार्य
- मातीमध्ये **राबणाऱ्या** शेतकन्यांना पाठबळ देणे
- शेतशिवारा मातीत राबणे
- कष्ट करणाऱ्यांना मदत करणे

२)

अ. जेथे दृष्टी पोहोचते असे ठिकाण — फुलाफुलांचे दाट ताटवे

ब. कवयित्रीच्या मते जपायची गोष्ट — सृष्टी

**२.** **१.** मातीमध्ये जे हात राबतो, तयास देऊ पुष्टी....

**२.** यंत्राच्या संगतीत मनुष्याला काय मिळेल ?

**३.** १. फेनभवल - फेसाप्रमाणे पांढरा

२. अनोखी - वेगळी

३. वृष्टी - पाऊस

४. तुष्टी - समाधान

**४.** आशयसौन्दर्य

कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी पर्यावरणाची जोपासना केली तरच माणसाला उद्या सुख, समाधान मिळेल याची जाणीव करून दिली आहे.

'हिरवी मने' यातून पर्यावरणाविषयीची जागर कवयित्रीने व्यक्त केली आहे**.** निसर्गाशी व या भूमीशी प्रत्येकाचे नाते आहे**.** वर्तमान वावरताना पर्यावरणाशी मातीशी असणारा आपला जिव्हाळा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. हिरव्या रंगाच्या नानाविध छटा समजून घेण्यासाठी**,** व्यक्तीजवळ 'हिरवं मन' असल पाहिजे**.** हिरवा रंग न्याहाळता आला पाहिजेत**.** समृद्ध पर्यावरणाच्या गोष्टी फक्त सांगण्यासाठी नाहीत आपल्याला पर्यावरणाविषक एक नवीन जाणीव मनात ठेवणे आवश्यक आहे **.**

**प्र. २. (आ)**

१. "हिरवंगार झाडासारखं"

**१) प्रस्तुत कवितेचे कवी** - जॉर्ज लोपीस

**२) कवितेचा विषय** - झाडांची सहनशीलता, दातृत्व सहकार्याची वृत्ती कठीण प्रसंगातही घट्ट पाय रोवून राहण्याची वृत्ती

**३) ओळींचा सरळ अर्थ**

पक्षी झाडावर विसाव्यासाठी येतात**.** वास्तविक पाहता झाड व पक्षी यांचे कोणतेच भावबंध नसतात. तरीही झाड त्यांचे मनापासून स्वागत करते**.** झाडाच्या मुळावर त्याच्या अस्तित्वावर कोणी घाव घातला **.**

तरी झाड मुकाटपणे कोणतीही तक्रार**,** न करता घाव सहन करते**.** थोडक्यात काय तर निः स्वार्थीपणे सर्वांना मदत करणे व सोशीकता हा झाडांचा गुण आपणही स्वीकारला पाहिजे**.**

**४) कवितेतून मिळणार संदेश** - निसर्गातील झाडाप्रमाणे आपणही आपल्या जीवनात आनंदाने राहिले पाहिजे . झाडांपासून सहनशीलता दातृत्व**,** सहकार्याची भावना कठीण प्रसंगातही पाय रोवून राहण्याची वृत्ती प्रफुल्लितपणा इ**.** गुण स्वीकारण्याची आवश्यकता आहे**.** हा संदेश या कवितेतून मिळतो**.**

**५) शब्दांचे अर्थ**

अ. मौन - न बोलणे    ब**.** खुडणे - तोडणे    क**.** व्रत – वसा    ड**.** पानझड - पानगळ

२. "योगी सर्वकाळ सुखदाता'

**१) कवितेच्या कवीचे नाव**- संत एकनाथ

**२) कवितेचा विषय -** योगी पुरुष व पाणी यांची तुलना. योगी पुरुष हा पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे.

**३) ओळींचा सरळ अर्थ -** जल किंवा पाणी हे शरीरावर साचलेला मळ दूर करते. परंतु योगीपुरुष हा आपल्यातील अंतर्बाह्य मळ दूर करतो. तहान लागली असता पाणी पिल्याने एक वेळ सुख लाभते पण पुन्हा थोड्या वेळाने तहान लागते . परंतु योगी पुरुषांच्या सहवासात सर्वाकाळ सुख आणि सुखच लागते. किंबहुना योगीपुरुष हा सदैव सुखदाताच असतो.

**४) कावतेतून मिळणारा संदेश -** ज्याप्रमाणे पाणी सर्वांची तहान भागवण्यासाठी, अन्न देण्यासाठी धरतीवर येते त्याप्रमाणेच जगाच्या कल्याणाकरिता संत सज्जन व योगी पुरुषांचा जन्म झालेला असतो. सर्वसामान्य जनांना योग्य मार्ग दाखवण्यासाठीच ते इहलोकात जन्म घेतात.

**५) शब्दाचे अर्थ**

| | |
|---|---|
| अ) पंखोवा - **पंख** | ब) जेवी - **ज्याप्रमाणे** |
| क) निवविणे - शांत करणे | ड) निजज्ञान - आत्मज्ञान |

**विभाग ३ - स्थूलवाचन**

**प्र.३.**

१. सूर्य : आज माझ्या जीवाला चैन पडत नाही. माझा अस्त झाल्यावर या पृथ्वीचे काय होणार याविषयी आम्हास चिंता लागून राहिली आहे.

पणती : अशी चिंता आपल्याला करण्याचे कारण ते काय . आपल्यासारख्या तेजोनिधीला हे असे चिंतीत होणे शोभत नाही.

सूर्य : मी निघून गेल्यावर या जगाला कोण प्रकाश देणार ही चिंता लागून राहीली आहे

पणती : मी एक विचारू का ? खरे तर मी आपणापेक्षा अतिशय काहान आहे. पण माझे कार्यही प्रकाश निर्माण करणंच आहे. माझा जीव इवलास आहे मी माझ्या परीने या भुतलावर प्रकाश देण्याचा प्रयत्न करेन.

'सूर्य : अहो आपल्या या दानतेला मी काय म्हणावे? मी खरच माझ्या अंतःकरणापासून आपला ऋणी राहू इच्छीतो. आपला जीव लहान असला तरी आपण महान कार्य करण्याची इच्छा दर्शवित आहात हे किती मोलाचे आहे.

पणती : आपण निश्चित मनाने आता अस्तास जावे. आम्ही या काळोखाला आमच्या प्रकाशाने आधिक सुंदर तर करूच पण या धरेवर प्रकाशही पसरवू.

२. डॉ होमी भाभा हे भारतीय अणुभौतिक शास्त्रज्ञ होते. भारताच्या अणुऊर्जा व अण्वस्त्र विकास कार्यक्रमाचे प्रणेते मानले जाते.

त्यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला म्हणून त्यांचे नाव अणुसंशोधन केंद्राला दिले आहे. **B.A.R.C.** "म्हणजे भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर ! त्यांचे व्यक्तिमत्व तरुण, नवीन शास्त्रज्ञ पिढीला स्फूर्तिदायक होते. लेखकाने त्यांच्याबद्दल एक आठवण सांगितली आहे - लेखक जेव्हा ट्रैनिंग स्कूलला शिकत होते. तेव्हा तिथे होमी भाभा तीन चार वेळा आले होते. मुलामुलींनी विचारले की आम्हा सर्वांना पुरेल इतके काम आहे का ? तेव्हा भाभा म्हणाले की तुम्ही काळजी करू नका, तुम्ही संशोधन करत रहा तुम्ही स्वतःच्या काम निर्माण करा काय काम करायचे ते तुम्ही स्वतःच ठरवा. बॉसने सांगितले तेवढेच काम करायचं ही प्रवृत्ती चुकीची आहे.

३. डॉ. अनिल काकोडकर जेव्हा बार्कमधील आपल ट्रेनिंग संपवून इंजिनीयर म्हणून बार्कमध्ये रुजू झाले तेव्हा तेथे त्यांना मेटलायझिंग प्रक्रियेवर काम करण्यास सांगण्यात आले. त्यासाठी असलेली यंत्रसामग्री असूनही ती कोणी वापरली नव्हती. डॉ. अनिल काकोडकर यांनी वापरायची ठरवली. त्यासाठी त्यांनी एक वेल्डर व फोरमनची मागणी केली. ती त्यांची मागणी नाकारण्यात आली आणि स्वतःच पुढाकार घेऊन ती गोष्ट पूर्ण करण्यास सांगण्यात आली

त्यांनी ते काम पूर्ण केल्यानंतर त्याच कामाची व्याप्ती संस्थेकडून वाढवण्यात आली आणि कोणतेही सहकार्य करण्यास संस्था तयार झाली नाही त्यावेळेस वरिष्ठानी त्यांना सांगितले कि तुम्ही हे काम करू शकता याचा विश्वास इतरांना वाटल्यावर मग त्यासाठी मदत मागणं योग्य आहे. स्वतःला सिद्ध करणं महत्त्वाच आहे. मेटलायझिंग प्रक्रियेवर काम करण्यास आतापर्यंत कुणी होकार दर्शवला नव्हता. सर्व सामग्री असूनही या कामामध्ये त्याचा वापर कसा करावा असे कुणासही वाटलं नव्हते. प्रत्येकाला मदतीची अपेक्षा होती. म्हणूनच ते काम आतापर्यंत अपूर्णच होते.

## विभाग ४ - भाषाभ्यास

**प्र.४ (अ)**

१. १) तुम्ही गावाला कधी जाणार? - प्रश्नार्थक वाक्य

२) किती प्रसन्न वातावरण आहे इथे ! - उद्गारार्थी वाक्य

२. १) पडेल ते काम करा.

२) हा चित्रपट चांगला आहे .

३. १) भारावून जाणे - प्रभावित होणे.

वाक्य - लता मंगेशकरांच्या सुरांनी सर्वजण भारावून जात.

२) झोकून देणे - पूर्णपणे सहभागी होणे.

वाकय - गावातील साक्षरता प्रसारासाठी रामरावांनी झोकून देऊन काम केले.

३) संकोच वाटणे - मनात कमीपणा वाटणे

वाक्य - चारचौघात बोलताना रमाला संकोच वाटत होता.

**प्र. ४. (आ)**

१. १) अ. स्तुती - **कौतुक** ब. माती - **मृदा**

२) अ. सरकारकडून शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मिळणारी रक्कम - **शिष्यवृत्ती**

ब. अनेक माणसाच्या सततच्या रहदारीमुळे तयार झालेली वाट - **पायवाट**

३) अ. काका - **काकी** ब. पाहुणी - **पाहुणा**

४) अ. कुटुंब - **कुटुंबे** ब. बांगडी - **बांगड्या**

२. १) निर्णय

२) दैनंदिनी

३.

१) " " - दुहेरी अवतरण चिन्ह

? - प्रश्नचिन्ह

२) ' ' - एकेरी अवतरण चिन्ह

. - पूर्णविराम

**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**प्र.५ (अ) खालील कृती सोडवा.** **(६)**

१. पत्रलेखन

पत्रलेखन करताना लक्षात ठेवायच्या गोष्टी

- पत्राचा विषय नीट समजून घ्या
- पत्राचा विषय औपचारिक पात्रात लिहिणे अपेक्षित आहे
- योग्य मायना (सुरुवात) व समारोप करावा
- आपले म्हणणे मुद्‌देसूदपणे मांडावे
- पत्राची भाषा पत्रस्वरुपानुसार असावी
- पत्रलेखनाचे टप्पे

१) दिनांक -

२) प्रति -

३) विषय - ____________

(अनौपचारिक पत्रात लिहू नये)

४) पत्राचे स्पष्टीकरण - ४ ते ५ परिच्छेदामध्ये करावे

५) पत्राचा शेवट

पत्र लिहिण्याचा पत्ता

ई-मेल

**किंवा**

२. **सारांशलेखन**

सारांश लेखन करता लक्षात ठेवायच्या गोष्टी .

१) उतारा काळजीपूर्वक नीट वाचावा .

२) त्यातील ठळक मुद्‌दे नमूद करावेत .

३) उदाहरणे पुन्हा लिहू नये.

**प्र.५. (आ)**

**१. जाहिरातलेखन (५० ते ६० शब्द)**

- विषय नीट समजून घ्या .
- विचार करून मुद्दे ठरवा .
- आकर्षक भाषेत शीर्षक लिहा.
- स्थळ, वेळ , दिनांक , संपर्क इत्यादी आवश्यक नोंदी नमूद करा.
- ठळक वैशिष्ट्ये नोंदवा.

**२. बातमीलेखन (५० ते ६० शब्द)**

- शीर्षक लिहावे.
- दिनांक , स्थळ , वेळ व संबंधित व्यक्तींचा अचूक उल्लेख करावा .
- वस्तुनिष्ठ व तटस्थ भूमिका घेणे .
- अपमानकारक भाषा टाळणे .
- बातमी भूतकाळात लिहावी .

**३. कथालेखन (८० ते ९० शब्द)**

- कथेचा आराखडा समजून घ्यावा, कथेची मध्यवर्ती कल्पना लक्षात घ्यावी .
- कथेची सुरुवात आकर्षक असावी. आवश्यकतेनुसार कथेत संवाद असावेत .
- कथेचा शेवट परिणाम कारक असावा, आवश्यक तेथे परिच्छेद पाडावेत .
- तात्पर्य लिहावे .
- शीर्षक द्यावे .
- अपूर्ण कथा पूर्ण करा या प्रश्नात प्रश्नपत्रिकेतील अपूर्ण कथा पुन्हा लिहू नये.

**प्र. ५. (इ) लेखनकौशल्य**

**१. प्रसंगलेखन**

**२. आत्मकथन**

**३. वैचारिक लेखन**

- निबंधाचा विषय नीट समजून घ्यावा.
- सुरुवात करताना सुविचार काव्यपंक्ती म्हणी यांचा वापर करावा.
- प्रसंगलेखन करताना भाषा ओघवती असावी . प्रसंग डोळ्यांसमोर उभा राहील अशाप्रकारे वर्णन करावे .
- योग्य परिच्छेद पाडावेत.
- शेवट 'बोधप्रद' विचारप्रवृत्त करणारा, आकर्षक असावा .
- आत्मकथनात सजीव , किंवा निर्जीव वस्तू आपणच आहोत, अशी कल्पना करून लेखने करायचे असते.
- वैचारिक निबंधात एखादा गंभीर विषय दिला जातो तो मुद्देसूद मांडावा.
- भाषा प्रत्ययकारी असावी .
- निबंधाचा विषय काळजीपूर्वक निवडावा.

*Together we will make a difference*